# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ९/०५/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -३२७** **विषय क्रमांक –३२७**

**दिनांक- ९/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२७**<br>**दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.जशुके/पापु/२४३/२०२३ दि.२५/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १६०४ दि.२५/४/२०२३ अन्वये, "पाणीपुरवठा विशेष योजना निधी" या लेखाशिर्षा अंतर्गत नविन कामाचा समावेश करणे, अंदाजपत्रकीय रक्कम व सन २०२३-२४ च्या अंदाजामध्ये तरतुद वाढविणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२७**<br>**दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.जशुके/पापु/२४३/२०२३ दि.२५/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १६०४ दि.२५/४/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मा.महापालिका (प्रशासक) ठराव क्र.२८३ दि.१४/०३/२०२३ अन्वये तसेच मा. प्रशासक ठराव क्र.३०६ दि.२९/०३/२०२३ अन्वये मान्यता मिळाली आहे. पाणीपुरवठा विभागाकडून नविन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक सादर करताना अमृत २.० योजना या नावाने लेखाशिर्षक मा.आयुक्त साहेब यांच्या स्वाक्षरीने दि.०८/०२/२०२३ च्या टिपणी नुसार उघडणेत आले असुन त्यास मान्यता मिळाली आहे. अमृत २.० योजना या लेखाशिर्षाखाली पाणीपुरवठा विभागाकडील एकूण १३ कामांचा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आला होता. सदर कामांची एकूण अंदाजपत्रकीय र.रु.१२६५ कोटी एवढी तसेच तरतुद र.रु.११० कोटी एवढी ठेवणेत आली होती. पाणीपुरवठा विभागाकडून मनपाच्या प्रचलित पध्दतीनुसार लेखा व वित्त विभागास अंदाजपत्रक सादर करणेत आले होते. परंतु संबंधित विभागाकडून अमृत २.० योजना या लेखाशिर्षाचा समावेश करणेत आलेला नाही. यापुर्वी सादर केलेल्या १३ कामांपैकी ३ कामे या विभागास पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्या मध्ये सुधारणा होणेकामी महत्वाची वाटत आहेत. सदरची कामे खालील प्रमाणे असुन नवीन कामाचा समावेश करणे, अंदाजपत्रकीय रकमेस तसेच सन २०२३-२४ च्या अंदाजामध्ये तरतुद ठेवणे यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच सन २०२३ -२४ या आर्थिक वर्षासाठी कामांना तरतुद ठेवणे यासाठी मा. स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागणार |

आहे. पाणीपुरवठा विभागाकडे मार्च २०२३ च्या अखेरीस सर्व लेखाशिर्ष मिळून र.रु.१५.९९ कोटी शिल्लक राहिले आहेत. सदर शिल्लक रकमेमधुन खालील कामांना तरतुद मिळणेस आवश्यक आहे.
नवीन अंदाजपत्रकात समाविष्ट करावयाची कामे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्षक | कामाची अंदाजपत्रकीय र.रु. | सन २०२३-२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|
| १ | दुर्गादेवी टेकडी येथे पाणीपुरवठ्या साठी G.S.R.बांधणे, से.क्र. २३ निगडी जलशुध्दीकरण केंद्र येथे २० द.ल.लि. क्षमतेची साठवण टाकी बांधणे व त्याकरीता उर्ध्वनलिका टाकणे, पंप हाऊस उभारणे तसचे तद्अनुषंगिक कामे करणे व १० वर्षाकरीता परिचालन व देखभाल दुरुस्ती करणे. | पाणीपुरवठा विशेष योजना निधी | १२८ कोटी | ५ कोटी |
| २ | पिंपरी चिंचवड शहरात प्रत्येक घराला मिटर सहित नळजोडणी देणे तसेच घोषित स्लम एरिया ( Notified slum ) मध्ये प्रत्येक घराला मिटर विरहीत नळजोडणी देणे. | पाणीपुरवठा विशेष योजना निधी | ४७ कोटी | ५ कोटी |
| ३ | निगडी से.क्र. २३ येथील जलशुध्दीकरण केंद्रापासुन मुंबई - पुणे हायवे लगत दापोडी पर्यंत जलवाहिनी टाकणे. | पाणीपुरवठा विशेष योजना निधी | ६८ कोटी | ५.९९ कोटी |
| | | एकूण | २४३ कोटी | १५.९९ कोटी |

तरी अंदाजपत्रक सन २०२३-२४ मध्ये नवीन कामांचा समावेश करणे, अंदाजपत्रकीय रक्कम आणि सन २०२३-२४ साठी तरतुद ठेवणे यासाठी वरील तक्त्यामधील सर्व कामांस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२८** — **विषय क्रमांक –३२८**

**दिनांक- ९/०५/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२८<br>दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.शि.वि/०५/कावि/२२८/२०२३ दि.२८/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १६२६ दि.२/५/२०२३ अन्वये, प्राथमिक शिक्षण विभागाकरीता नविन लेखाशिर्ष निर्माण करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२८<br>दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.शि.वि/०५/कावि/२२८/२०२३ दि.२८/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १६२६ |

| | |
|---|---|
| | दि.२/५/२०२३ अन्वये, प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने एकूण १०५ शाळांसाठी १०७ डेटा एंट्री ऑपरेटर कंत्राटी पदधतीने निविदा प्रसिध्द करून नेमनेकामी कार्यवाही प्रस्तावीत करणेत आली आहे. सदरच्या कामासाठी किमान वेतन दराने १२ महिन्यांसाठी र.रू.३,५२,६१,२०८/- इतका खर्च अपेक्षित आहे, तसेच कला शिक्षक, क्रीडा शिक्षक व समुपदेशक अशी एकूण ८५ पदे कंत्राटी पदधतीने निविदा प्रसिध्द करून नेमणूक करणेची कार्यवाही प्रस्तावित असून किमान वेतन दरानुसार ११ महिन्यांकरीता र.रू.२,५६,७६,९७०/- खर्च अपेक्षित आहे. वरील दोन्ही कामांकरीता अंदाजे र.रू.६,०९,३८,१७८/- (अक्षरी र.रु.सहा कोटी नऊ लाख अडोतीस हजार एकशे अठठयाहत्तर फक्त) खर्च अपेक्षित आहे, त्यामुळे शिक्षण विभागाकडील "शिक्षण विषयक नाविन्यपूर्ण योजना" या लेखाशिर्षातील र.रु.१,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) नविन लेखाशिर्ष **"बाहयस्त्रोताद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करणे"** या लेखाशिर्षावर वर्ग करणेकामी तसेच सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकात सदर कामासाठी तरतूद उपलब्ध नाही, त्यामुळे सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकात **"बाहयस्त्रोताद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करणे"** हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३२९** **विषय क्रमांक –३२९**

**दिनांक- ९/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३२९<br>दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. क्रीडा/७/कावि/१५०/२०२३दि.९/५/२०२३ अन्वये, म.न.पा.चे गट नं. ७२/१ आरक्षण क्र. १/१३७ खेळाचे मैदान, जाधव वाडी चिखली येथे "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" विकसित करून "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" हे कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठान, थेरगाव चिंचवड पुणे ४११०३३ यांना ३ वर्षाकरिता प्रशिक्षणाकरिता कराराने चालविण्यास देणेबाबत. |
| **ठराव क्र. ३२९<br>दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. क्रीडा/७/कावि/१५०/२०२३ दि.९/५/२०२३ अन्वये, म.न.पा.चे गट नं. ७२/१ आरक्षण क्र. १/१३७ खेळाचे मैदान, जाधव वाडी चिखली येथे "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र"विकसित करून "पिंपरी चिंचवड |

| | |
|---|---|
| | राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठान, थेरगाव चिंचवड पुणे ४११०३३ या संस्थेने ठरवलेली फी आकारून एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ६० टक्के मुलांना त्यांना प्रशिक्षण देणेची मुभा राहील व एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ४० टक्के मुले/मुलींना म.न.पा. हद्दीतील शाळेतील संबंधित क्रीडा शिक्षक यांचेशी समन्वय साधून राष्ट्रीय घोडेस्वारी खेळासाठी १८ वर्षाखालील पात्र मुलांची निवड करून मोफत प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. या अटीवर कृष्णा सामाजिक सेवां प्रतिष्ठान, थेरगाव चिंचवड पुणे ४११०३३ यांना "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" ३ वर्षे कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>राष्ट्रीय खेळाडु असुन प्राचीन काळापासून घोडेस्वारी ही एक ॲक्टिव्हिटी आहे जी आता साहसी खेळात बदलली आहे. इतिहासाकडे पाहिल्यास, त्यात घोड्यांची महत्त्वाची भूमिका त्यांच्या निष्ठा शौर्य आणि सहनशक्तीमुळे होती. भारताच्या विकासात घोड्यांची मोलाची भूमिका आहे. इक्वेस्ट्रियन फेडरेशन ऑफ इंडियाची स्थापना १९६७ मध्ये करण्यात आली होती आणि ती भारत सरकारकडे रीतसर नोंदणीकृत आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती, आशियाई खेळ आणि जागतिक अजिंक्यपद या खेळाला मान्यता आहे. इक्वेस्ट्रियन फेडरेशन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आणि खेलो इंडियाने घालून दिलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांवर एक अकादमी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. अश्वारोहणाच्या जाहिरातीसाठी आणि एक व्यासपीठ तयार करण्यासाठी त्यांना पाठिंबा हवा आहे जेणेकरून शहरातील खेळाडूंना राज्य आणि देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल. सध्या कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठाण संचालीत हॉर्स रायडिंग ॲकॅडमी शिक्रापुर बुरुजवाडी येथे वैयक्तीक तत्त्वावर चालु असुन तेथे खालील प्रमाणे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत.<br><br><table><tr><td>अनु.क्र</td><td>खेळाडूचे नाव</td><td>खेळातील स्तर</td></tr><tr><td>१</td><td>अंतरा रविंद्र टेमगिरे</td><td>इंटरमिडिएट</td></tr><tr><td>२</td><td>प्रतिक विजय टेमगिरे</td><td>बिगीनर</td></tr><tr><td>३</td><td>सोहम फोड</td><td>रायडर</td></tr><tr><td>४</td><td>गंगाधर पोद्दार</td><td>बिगीनर</td></tr><tr><td>५</td><td>शितल पालवे</td><td>ॲडव्हान्स</td></tr><tr><td>६</td><td>अनिकेत वाघोडे</td><td>ॲडव्हान्स</td></tr><tr><td>७</td><td>आर्या ठाकूर</td><td>ॲडव्हान्स</td></tr></table><br>घोडेस्वारी खेळामध्ये भारताला ऑलिम्पिक, कॉमनवेल्थ, एशियन चॅम्पियनशिप, वर्ल्डकप यात पदके मिळाली आहेत. तरी हा खेळ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावा व पिं.चिं.मधुन जास्तीत जास्त खेळाडु घोडेस्वारी या खेळाकडे वळावेत यासाठी कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठाण सतत प्रयत्न करत आहे. म.न.पा.चे गट नं. ७२/१ आरक्षण क्र. १/१३७ खेळाचे मैदान, जाधव वाडी चिखली येथे"पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र"विकसित करून "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र"कृष्णा सामाजिक सेवां प्रतिष्ठान, थेरगाव चिंचवड पुणे ४११०३३ यांना राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षणासाठी ३ वर्षे |

| | |
|---|---|
| | कराराने चालविण्यास दिल्यास म.न.पा.परिसरात राष्ट्रीय खेळाडू तयार होऊन पिंपरी चिंचवड शहराचे नाव राष्ट्रीयस्तरावर झळकण्यास मदत होईल. सबब,म.न.पा.चे गट नं. ७२/१ आरक्षण क्र. १/१३७ खेळाचे मैदान, जाधव वाडी चिखली येथे "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" विकसित करून "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र "कृष्णा सामाजिक सेवांप्रतिष्ठान, थेरगाव चिंचवड पुणे ४११०३३ या संस्थेने ठरवलेली फी आकारून एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या६० टक्के मुलांना त्यांना प्रशिक्षण देणेची मुभा राहील व एकुण प्रशिक्षणार्थी संख्येच्या४० टक्के मुले/मुलींना म.न.पा. हद्दीतील शाळेतील संबंधित क्रीडा शिक्षक यांचेशी समन्वय साधून राष्ट्रीय घोडेस्वारी खेळासाठी १८ वर्षाखालील पात्र मुलांची निवड करून मुलांना मोफत प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. या अटीवर३ वर्षाकरिता कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३३०** **विषय क्रमांक –३३०**

**दिनांक- ९/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३०**<br>**दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.साप्रवि/२/कावि/२३५/२०२३ दिनांक ०९/०५/२०२३ अन्वये, सह आयुक्त पदावरील पदोन्नतीस मान्यता घेणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३०**<br>**दिनांक-९/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.साप्रवि/२/कावि/२३५/२०२३ दिनांक ०९/०५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'सह आयुक्त' अभिनामाचे १ पद पे.लेवल S-२४वेतनश्रेणी ७११००-२११९०० मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता रिक्त आहे. 'सह आयुक्त' अभिनामाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक २४/०४/२०२३रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार उपआयुक्त/सहाय्यक आयुक्त या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, उप आयुक्त यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्या संदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका |

| | |
|---|---|
| | क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच महापालिका सभेच्या मान्यतेने 'सह आयुक्त' अभिनामाच्या रिक्त पदावर पे.लेवल S-२४ वेतनश्रेणी ७११००-२११९०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सदरच्या समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.<br><br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर कार्यरत आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुतच्या विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**